27 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात आयोजित शिव-महोत्सवात गीत सादर करताना प्रसेनजित कोसंबी. समोर उपस्थित श्रोते. (छाया : एस. अली)

# शिव-महोत्सवात गुणवंतांचा गौरव

## उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदेंना 'शिव-वनश्री' पुरस्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठात पार पडलेल्या १४ व्या शिव-महोत्सवात उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना 'शिव-वनश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याच बरोबर शिवाजी विद्यापीठात उत्तम कामगिरी करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हास्ते 'शिव गौरव' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमाने शिव-महोत्सवाची सांगता झाली.

शनिवारपासून शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रामध्ये आजी-माजी विद्यार्थ्यांतर्फे आयोजित शिव-महोत्सवाचा रविवारी समारोप झाला. तत्पूर्वी शिवाजी विद्यापीठात उत्तम कामगिरी करणाऱ्यांचा आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे शिव-पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यंदाचा मानाचा 'शिव-वनश्री' पुरस्कार उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव यांच्यासह प्रशांत झांपले, वैशाली कोकाटे, अजय आयरेकर, प्रकाश चौगुले, के. डी. माने, सुरेश बंडगर आणि अभियांत्रिकी विभाग यांना 'शिव-गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रसेनजित कोसंबी, वेदा सोनुले, गायिका वैदेही जाधव, सागर बगाडे, सँड आर्टिस्ट अमित माळकरी, श्वास अॅकॅडमीचे ओंकार शेटे यांनी सादरीकरण केले. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात वेदा सोनुले, वैदेही जाधव यांनी व्यंकटेश स्तोत्राने करत वातावरण भारून टाकले. प्रसेनजित कोसंबीने 'जिया धडक, जिया धडक जाये' हे गीत सादर केले. त्याने 'थारे बिना लागे नहीं मारा जिया रे' हे सुफी गीत सादर करत श्रोत्यांची दाद मिळवली. सार्थक क्रिएशनच्या कलाकारांनी गोविंदा स्पोशल डान्स सादर केला. सागर बगाडे यांनी 'जिस देश में गंगा रेहता है या गाण्यावर डान्स केला. कला नृत्य एस. एम. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. श्वास अॅकॅडमीच्या कलाकारांनी २६/११ च्या हल्ल्यात हौताम्य पत्करलेल्या जवानांना आदरांजली वाहिली. संगीता कुलकर्णी यांनी मराठी व हिंदी गीते सादर केली.अनिल बोकेफोडे याने नंटरंग चित्रपटातील खेळ मांडला हे गीत म्हटले. बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सुनील पाटील, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डी. के. गायकवाड, मंदार पाटील, नीलेश यादव, संतोष माने, अवधूत अपराध यांच्यासह शिव-महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कडोलीकर, चांगदेव बंडगर यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजी–माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या शिव-महोत्सव २०१७ मध्ये उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांना मानाचा शिव-वनश्री पुरस्कार प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

### लघुपट महोत्सव ठरला आकर्षण

शिव-महोत्सव २०१७ आणि अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रॉडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळच्या सत्रात लघुपट महोत्सव पार पडला. यंदाचा हा दुसरा लघुपट महोत्सव असून ते महोत्सवाचे आकर्षण ठरले. महोत्सवामध्ये शुभम चेचरचा 'दि अनसीन व्हिलेज', स्वप्नील राजशेखर यांचा 'सावट', राहुल मोरे यांचा 'उतारा', किरणसिंह चव्हाण यांचा 'याकुब', अजय कुरणे यांचा 'बलुतं', संग्राम भालकर यांचा 'वारसा', केवल लोट यांचा 'गो ग्रीन', सुजित जाधव यांचा 'अर्धविराम', परशुराम गवळी यांचा 'स्ट्रगलर' हे लघुपट सादर करण्यात आले. या महोत्सवापासून यंदापासून दरवर्षी एका बाहेरील उत्कृष्ट दिग्दर्शकाचा 'शो-केस'ही सादर केला जाणार आहे. त्यामध्ये शो-केस ऑफ किरण साष्टे सादर करण्यात आला. त्या अंतर्गत दादू, मृण्मयी आणि मेगाब्लॉक हे लघुपट दाखविण्यात आले.

2 7 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अप्रतिम नृत्याविष्काराने थिरकली तरुणाई

## शिवमहोत्सवाची सांगता : डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा शिव-वनश्री पुरस्काराने गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : हिंदी-मराठी गीतांवरील डोलणारी तरुणाई, अप्रतिम नृत्याविष्काराने थिरकलेले स्टेज व शिव-वनश्री व शिव पुरस्काराने केलेल्या कौतुकाने लोककला केंद्र आज रोमांचित झाले. प्रसेनजित कोसंबी व संगीता कुलकर्णी यांनी गायलेल्या गाण्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांतर्फे आयोजित शिवमहोत्सव कार्यक्रमाची आज सागंता झाली. या वेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना शिव-वनश्री, तर प्रा. डॉ. ए. डी. जाधव, डॉ. टी. एस. कांबळे, प्रशांत झंपले, वैशाली कोकाटे, अजय आयरेकर, सुरेश बंडगर यांना वनश्री पुरस्काराने गौरविले.

वैदेही जाधव व वेदा सोनुले यांनी व्यंकटेश स्तोत्र सादर करून कार्यक्रमास सुरवात झाली. या स्तोत्र पठणाने लोककला केंद्र स्तब्ध झाले आणि उपस्थितांनी प्रत्येक स्वर कानास साठवून घेतला. प्रसेनजित कोसंबी व संगीता कुलकर्णी यांच्या जादुई स्वरांनी केंद्रातील उपस्थित तरुणाई थिरकू



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांतर्फे आयोजित शिवमहोत्सवात शिव-वनश्री पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून स्वीकारताना उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

लागली. 'लगता है क्यु मुझे' व 'जिया धडक धडक' गीतांवर तरुणाईने जल्लोष केला. सार्थक क्रिएशनच्या ग्रुपने अप्रतिम नृत्याविष्काराने कार्यक्रमाची उंची वाढवली. 'गोविंदा डान्सने लोककला केंद्राला उधाण आले. एस. एम. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले कलानृत्य दिलखेचक ठरले.

श्वास अकादमीच्या कलाकारांनी २६/११ मधील शहिदांना मानवंदना देऊन देशप्रेमाची हाक दिली. त्यानंतर देशभक्तीत दंगलेल्या तरुणाईला संगीता कुलकर्णीनि गुलाबी हवा या गाण्याने प्रेमरसाची अनुभूती दिली. अभियांत्रिकीचा विद्यार्थी अनिल बोकेफोडेने 'नटरंग' चित्रपटातील खेळ मांडिला गीताने सभागृह दणाणून साडले. अमित माळीने सँड आर्ट सादर करून टाळ्यांची दाद घेतली.

या प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना शिव-वनश्री, तर प्रा. डॉ. ए. डी. जाधव, डॉ. टी. एस. कांबळे, प्रशांत झंपले, वैशाली कोकाटे, अजय आयरेकर, सुरेश बंडगर यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयुडी डॉ. डी. आर. मोरे, स्पेक्ट्रमचे सुनील पाटील, देवस्थान समितीचे सदस्य विजय पोवार, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, संतोष माने, अक्षय मोरे, नीलेश यादव, अवधूत अपराध, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी उपस्थित होते.

27 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवमहोत्सवात तरुणाईचा जल्लोष

## शिव-वनश्री पुरस्काराने डॉ.व्ही.एन.शिंदे यांचा गौरव; अलोट गर्दी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या शिव-महोत्सवात मराठी-हिंदी गीते, नृत्याविष्काराच्या तालावर ठेका धरत तरुणाईने जल्लोष केला. गीत-नृत्याच्या कार्यक्रमाबरोबरच 'शिव-वनश्री' व 'शिव गौरव' पुरस्कारांचे वितरण झाले.

विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आजी-माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित शिवमहोत्सवाची रविवारी सांगता झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना शिव-वनश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डॉ. ए. डी. जाधव, डॉ. पी. एस. कांबळे, प्रशांत झमले, वैशाली कोकाटे, के. डी. माने, अजय आयरेकर, सुरेश बंडगर यांच्यासह अभियांत्रिकी विभाग यांचा शिव गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

वैदही जाधव व वेदा सोनुले यांनी सादर केलेल्या व्यंकटेशन स्त्रोताने सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर प्रसेनजित कोसंबी याने सादर केलेल्या 'जिया धडक-धडक' गीताला तरुणाईने टाळ्या-शिट्यांची दाद देत जल्लोष केला. संगीता कुलकर्णी यांनी सादर केलेल्या 'प्यार करनेवाले जीते है, शान से' या गीतास तरुणाईने वन्स मोअरची दाद दिली. सार्थक क्रिएशन ग्रुपच्या कलाकारांनी गोविंदा डान्स सादर केले. सागर बगाडे यांच्या 'जिस देश में गंगा रहता है' या नृत्यावर तरुणाई डोलली. तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थी अनिल बोकेफोडे याच्या 'खेळ मांडला' गीताने वेगळाच अनुभव दिला. दिल्ली येथे कला उत्सवामध्ये सादर केलेले गोंधळ नृत्य एस. एम. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. श्वास अकादमीच्या कलाकारांनी २६/११ मध्ये बळी पडलेल्या शहिदांना मानवंदना दिली. अमित माळीने 'सँड आर्ट'ची उत्कृष्ट कला सादर करीत वाहवा मिळविली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, देवस्थान समितीचे विजय पोवार, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. प्रवीण कोडोलीकर, डॉ. चांगदेव बंडगर, संतोष माने, अक्षय मोरे, नीलेश यादव, अवधूत अपराध, मंजित माने, अश्विनी जगताप, सागर चव्हाण, प्रियंका धनवडे, नितीन पाटील, विश्वास माने, मिलिंद कांबळे उपस्थित होते.



कोल्हापूर : शिव-महोत्सवात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते 'शिव-वनश्री' पुरस्कार उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. डी. आर. मोरे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. के. गायकवाड आदी. (छाया : तय्यब अली)



गीत सादर करताना प्रसेनजीत कोसंबी व संगीता कुलकर्णी

### पर्यावरण संवर्धन, शेतकऱ्यांच्या व्यथा अन् अंधश्रद्धेवर भाष्य...

ॲन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रोडक्शन हाऊसच्या वतीने लोककला केंद्रात लघुपटमहोत्सव झाला. सामाजिक विषय, तरुणांचे प्रश्न, पर्यावरण संवर्धन, शेतकऱ्यांच्या व्यथा, अंधश्रद्धा आदी विषयांवर लघुपटांनी प्रकाशझोत टाकला. परिस्थितीमुळे केशकर्तन व्यवसाय करणाऱ्या स्त्री जीवनावर भाष्य करणाऱ्या 'बलुतं' या लघुपटाने महोत्सवास प्रारंभ झाला. 'उतारा' लघुपटातून अंधश्रद्धा व जादुटोणा या विषयावर भाष्य केले. त्यानंतर याकुब, वारसा, स्ट्रगलर, कॉस्ट अवे, गो ग्रीन, कोल्हापूर अनसीन व्हिलेज यांसह किरण साष्टे यांच्या मृण्मयी, दादू, मेगा ब्लॉक यांसारखे दर्जेदार लघुपट दाखविण्यात आले. अभिनेते स्वप्नील राजशेखर यांच्या 'सावट' या लघुपटाने महोत्सवाची सांगता झाली.

27 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांस्कृतिक कार्यक्रमाने शिव-महोत्सवाची सांगता

## डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना विशेष पुरस्कार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा वनश्रीने गौरव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गेली दोन दिवस सुरू असलेल्या शिव-महोत्सवाची सांगता विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. यावेळी प्रसेनजित कोसंबी, संगीता कुलकर्णी यांनी हिंदी चित्रपटातील गायलेल्या गीतांना टाळ्या, शिट्यांनी प्रेक्षकांनी दाद दिली. सार्थक क्रिएशन, श्वास ॲकॅडमीच्या नृत्याविष्काराने प्रेक्षकांची मने जिंकली. संगीत व नृत्याविष्कारात विद्यापीठाची सायंकाळ रंगली.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती विद्यापीठातील लोककला केंद्रात आयोजित शिव-महोत्सवाच्या समारोपप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा विशेष सत्कार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना 'शिव-वनश्री पुरस्काराने तर अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. ए. डी. जाधव, प्रशांत झंपले, इंजिनिअरिंग विभागातील गिरीश कुलकर्णी व सर्व कर्मचारी यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शिवश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. याप्रसंगी स्पेक्ट्रम ॲकॅडमीच्या 'रिझनिंग" पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

श्वास ॲकॅडमीने आपल्या नृत्यातून शहीदांना श्रद्धांजली वाहीली. त्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारातून सिमेवरील लढा, पोलीस दलातील शहीद यांच्या बलीदानाचा सारा इतिहासच उलघडला. फिनिक्स क्रिएशनने स्कीट सादरीकरण केले. सार्थक क्रिएशनच्या सागर बगाडे व सहकारी कलाकारांनी 'गोविंदा स्पेशल" थीमवर नृत्याविष्कार केला. स. म. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गोंधळी गीतावर बहारदार नृत्य सादर केले. वैदेही जाधव व मेघा सोनुले यांनी व्यंकटेश स्त्रेत, अमित माळवी यांनी 'सँड आर्ट" तर अनिल बोकेफोडे यांनी नंटरंग चित्रपटातील 'खेळ मांडला..." यासह अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रेक्षकांच्या डोळयाचे पारणे फिटले. सांस्कृतिक कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी टाळ्या आणि शिट्यांच्या आवाजाने दाद दिली. गाण्यांच्या तालावर तरूणाई थिरकली.

शिव-महोत्सवाचे प्रास्ताविक सागर बगाडे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. सत्यजित कोसंबी यांनी केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले. यावेळी स्पेक्ट्रम ॲकॅडमीचे संस्थापक सुनील पाटील, स्पेक्ट्रम ॲकॅडमीचे संचालक मनिषा पवार, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप देसाई, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव विजय पोवार, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, शाहुपुरी पोलीस स्टेशनचे ए. पी. आय. विद्या जाधव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड,डॉ. प्रविण कोडोलीकर, प्रशासनधिकारी डॉ. डी. पी. माने, प्रतिभा दिक्षीत, मंदार पाटील, निलेश यादव आदी मान्यवर उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे आयोजित 'शिव-महोत्सवा'त कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रशांत झंपले, इंजिनिअरिंग विभागातील गिरीश कुलकर्णीसह त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना शिव-वनश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोबत डॉ. डी. आर. मोरे, सुनील पाटील, मनीषा पवार, विजय पोवार, संतोष माने, मंदार पाटील, निलेश यादव, डॉ. आर. व्ही. गुरव आदी.**

27 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोत्सवाची सांगता :** उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांना 'शिव-वनश्री' पुरस्कार प्रदान

# शिवमहोत्सवात बहारदार नृत्य, लघुपटांची मेजवानी

**कोल्हापूर :** बहारदार नृत्य, लघुपटांची मेजवानी आणि 'शिव-वनश्री' पुरस्काराचे वितरण सोहळ्यामध्यें शिवाजी विद्यापीठातील शिवमहोत्सवाची रविवारी सांगता झाला. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना 'शिव-वनश्री' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

शिवाजी विद्यापीठातील आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे विद्यापीठातील लोककला केंद्रात दोनदिवसीय शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.





शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या शिव-महोत्सवाच्या सांगताप्रसंगी रविवारी उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांना 'शिव-वनश्री' पुरस्कार प्रदान करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठातील शिव महोत्सवात गीत सादर करताना प्रसेनजीत कोसंबी.

शिवमहोत्सवाच्या शनिवारी पहिल्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमानंतर रविवारी महोत्सवाची सुरुवात 'अँन अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रॉडक्शन्स'च्या सहकार्याने आयोजित लघुपटाने झाली. त्यामध्ये केशकर्तन करून उदरनिर्वाह करणाऱ्या स्त्रीवरील 'बलुतं', 'उतारा' लघुपटातून 'अंधश्रद्धा व जादुटोणा' या विषयावर परखड भाष्य केले. 'गोग्रीन'मधून पर्यावरणाचा संदेश, तसेच 'वारसा' व 'दादू' या लघुपटाने सामाजिक स्थितीवर भाष्य करण्यात आले. हे लघुपट पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

रविवारी सायंकाळी 'इंडियन आयडॉल'फेम प्रसेनजीत कोसंबी, ई-टीव्ही 'सुपर वुमन फेम' वेदा सोनुले, गायिका वैदेही जाधव, कोरिओग्राफर सागर बगाडे, सँड आर्टिस्ट अमित माळकरी, श्वास अकॅडमीचे ओंकार शेटे यांच्या कला-गुणांच्या सादरीकरणाने समारोप अविस्मरणीय ठरला. सायंकाळच्या सत्रांची सुरुवात व्यंकटेश स्त्रोताने झाली. त्यानंतर प्रसेनजीत कोसंबी याने 'जिया धडक धडक' या गाण्याने उपस्थितांना डोलण्यास भाग पाडले. यानंतर सार्थक क्रिएशनच्या ग्रुपने सादर केलेल्या गोविंदा डान्सचे सादरीकरण करण्यात आले. दिल्ली येथील कला उत्सवामध्ये एस. एम. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला कलानृत्याची जादू येथेही पाहायला मिळाली. श्वास अकादमीच्या कलाकारांनी शहिदांना मानवंदना देऊन देशप्रेम जागृत केले. पाठोपाठ संगीता कुलकर्णीने 'गुलाबी हवा' या गाण्याने पुन्हा एकदा गंभीर झालेल्या वातावरणात नवचैतन्य आणले. हिंदी-मराठी गीतानंतर अमित माळीने 'सँड आर्ट'ची उत्कृष्ट कला सादर केली.

देवस्थान समितीचे सदस्य विजय पोवार, शिवमहोत्सवाचे अध्यक्ष डॉ. प्रवींण कोडोलीकर, सचिव डॉ. चांगदेव बंडगर, नितीन पाटील, ॲड. सचिन आवळे, विश्वास माने, योगेश माने, विशाल कांबळे, डॉ. सरोज बिडकर, संतोष माने, अक्षय मोरे, नीलेश यादव,आदी यांच्यासह आजी - माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## यांना गौरविण्यात आले

महोत्सवाच्या समारोपप्रसंगी अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव यांच्यासह प्रशांत झांपले, वैशाली कोकाटे, अजय आयरेकर, प्रकाश चौगुले, के. डी. माने, सुरेश बंडगर आणि अभियांत्रिकी विभागाला 'शिवगौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयुडी डॉ. डी. आर. मोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

27 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १२९.६ टन कार्बन उत्सर्जन रोखले

Maruti.Patil
@timesgroup.com
Tweet : @MarutipatilMT

**शिवाजी विद्यापीठाचा 'नो व्हेइकल डे' उपक्रम ठरतोय फलदायी**

**कोल्हापूर :** वाढते प्रदूषण आणि वाहनांची संख्या लक्षात घेता किमान शिवाजी विद्यापीठाच्या आवारात दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी राबवण्यात आलेला 'नो व्हेइकल डे' फलदायी ठरला आहे. विद्यापीठाच्या आवारात दररोज होणारा २.७ टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन रोखण्यास अटकाव बसला आहे. गेल्या चार वर्षांत अशा प्रकारे एकूण १२९.६ टन कार्बन उत्सर्जन होण्यापासून मुक्तता झाली आहे. विद्यापीठाने राबवलेल्या या पथदर्शी उपक्रमाची सर्वच सरकारी कार्यालयांनी नोंद घेऊन 'नो व्हेइकल डे' उपक्रम राबविल्यास शहरातील हवा प्रदूषणालाही आळा घालता येईळ.

विद्यापीठ परिसरातील वातावरण ऑक्सिजनयुक्त ठेवण्यासाठी व दररोज उत्सर्जित होणाऱ्या कार्बन डायऑक्साइडला अटकाव करण्यासाठी तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जी. पवार यांनी दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी 'नो व्हेइकल डे' उपक्रम सुरू केला. गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम अव्याहतपणे सुरू आहे. त्याचे परिणामही चांगले दिसू लागले आहेत. विद्यापीठाची मुख्य इमारत, मानव्यशास्त्र, सायन्स, भाषा भवन व अन्य ठिकाणी अधिकारी, कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी अशा सर्वांची दररोज सरासरी २ हजार ६२९ वाहने परिसरात फिरत असतात. सुमारे अर्धा ते एक किलोमीटरच्या अंतरात १४२ लिटर इंधन खर्च होते. त्यातून दररोज २.७ टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन होते.

विद्यापीठ परिसरातील हिरवाई लक्षात घेवून उत्सर्जित होणाऱ्या वायूचे प्रमाण जास्त असल्याने महिन्यातून एक दिवस 'नो व्हेइकल डे' उपक्रम राबण्यात आला. एक दिवसाचा प्रवास स्वत:च्या वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतुकीने करावा अशी ही संकल्पना आहे. इंधन बचतीबरोबरच हवा प्रदूषण टाळण्यासाठी घेतलेल्या उपक्रमाचा चांगलाच फायदा झाला आहे. महिन्यातील एका दिवशी २.७ टन यांप्रमाणे वर्षात ३२.४ टन आणि चार वर्षात १२९.६ टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जिताला विद्यापीठाच्या उपक्रमामुळे अटकाव बसला आहे. तसेच १४२ लिटर इंधनामुळे चार वर्षात सहा हजार ८१६ लिटर इंधनाची बचत झाली आहे.

### पर्यावरणशास्त्र विभागाचे निष्कर्ष (विद्यापीठ परिसर)

| | |
|---|---|
| दररोजच्या मोटारसायकल | - २३८९ |
| दररोजच्या चारचाकी गाड्या | - २४० |
| कॅम्पसमध्ये लागणारे दररोजचे इंधन | - १४२ |
| दररोज उत्सर्जित होणारा कार्बन | - २.७ टन |
| दिवसभरात कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन | - २.७ टन |
| चार वर्षांत रोखलेले कार्बन डायऑक्साइड | - १२९.९ टन |
| चार वर्षांतील इंधन बचत | - ६८१६ लिटर |



### सार्वजनिक वाहतुकीला बळ मिळेल

विद्यापीठ राबवण्यात येत असलेल्या नो व्हेइकल डेमुळे अनेक कर्मचारी व विद्यार्थी सार्वजनिक वाहतूक वापरतात. त्यामुळे सरकारच्या करांमध्ये चांगली वाढ होत आहे. विद्यापीठाप्रमाणे इतर सरकारी कार्यालयांतील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग केल्यास सरकारी करामध्ये चांगले उत्पन्न जमा होईल. त्यामुळे त्याचा वापर पायाभूत सुविधांसाठी केला जाऊ शकतो. त्यामुळे पायभूत सुविधांचा दर्जा वाढवण्यास संधी मिळेल.

**इंधन हा संपणारा नैसर्गिक स्त्रोत असल्याने त्याचा गांभीर्यने विचार करण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठाने एक दिवस राबवलेल्या नो व्हेइकल डेमुळे कार्बनडाय ऑक्साइड उत्सर्जनावर चांगला परिणाम झाला आहे. असा उपक्रम इतर सरकारी कार्यालयांत झाल्यास त्याचा फायदा पर्यावरण संरक्षण करण्यावर होईल.**

**- डॉ. पी. डी. राऊत,**
**विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र**



# 'मराठी आमुचि मायबोली' सांस्कृतिक कार्यक्रम

## मराठी भाषा गौरव दिन निमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन; शाहीर नंदेश उमप, पुष्कर श्रोत्री, सुचित्रा भागवत यांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २७) सायंकाळी ६.३० वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने 'मराठी आमुचि मायबोली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. नकाशे एन्टरटेन्मेंटची प्रस्तुती असलेल्या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य, नाट्य, गीत-संगीताच्या माध्यमातून मराठी भाषा व संस्कृतीची महान परंपरेचे दर्शन घडणार आहे. यात अभंग, भारूड, गोंधळ, पोवाडा, पारंपरिक लावणी, स्त्री साहित्य, मंगळागौर, लग्नगीत, भोंडला, संगीतनाट्य, विद्रोही साहित्य, प्रहसन आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. अभिनेता पुष्कर श्रोत्री, गायक धनंजय म्हसकर, नंदेश उमप, निरंजन भाकरे, गायिका सोनाली कर्णिक, सुचित्रा भागवत आदी कलाकार सहभागी होऊन कलाविष्कार सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे लेखन अजित परब व मंदार खराडे यांनी केले असून दिग्दर्शन व संकल्पना सुभाष नकाशे यांची आहे. सुनील कुलकर्णी निर्मिती सूत्रधार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिली.



### पथनाट्य, कविसंमेलन..

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठामार्फत आठवडाभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये निबंध लेखन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, निमंत्रितांचे कविसंमेलन, वाङ्मयीन प्रवाह या विषयावर चर्चासत्र, माझी शाळा, मराठी शाळा या विषयावर पथनाट्य, विकीपिडिया नोंदलेखन कार्यशाळा आदी उपक्रमांचा समावेश आहे.

27 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' आजपासून

## डॉ. थोरात उलगडणार अभिनेते राहुल बोस यांची संघर्षमय वाटचाल

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : युवकांच्या स्वप्नांना भरारी देण्यासाठी सकाळ माध्यम समूह व शिवाजी विद्यापीठातर्फे डीवायपी ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमास उद्यापासून (ता. २७) प्रारंभ होत आहे. अभिनेते राहुल बोस यांच्या करिअरची संघर्षमय वाटचाल उलगडली जाणार असून, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात त्यांची मुलाखत घेणार आहेत.

विद्यापीठातील लोककला केंद्रात सायंकाळी सहा वाजता कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. राजुरी स्टील कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक असून, मॉडर्न होमिओपॅथी हेल्थ पार्टनर, मार्व्हलस इंजिनिअर्स, पार्थ फाऊंडेशन, लक्ष्मी सेल्स, तनिष्क ज्वेलर्स, सीएमएम अँरेना सहप्रायोजक

पान ९ वर »

**विनामूल्य प्रवेश**

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात ५ मार्चपर्यंत दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत हा उपक्रम होईल. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य असेल. कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था केली जाणार आहे.

### असे आहेत राहुल बोस...



राहुल बोस हे बहुरंगी व्यक्तिमत्त्व आहे. केवळ अभिनयच नव्हे, तर दिग्दर्शक, पटकथालेखक, सामाजिक कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. इतकेच नव्हे, तर ते भारताकडून रग्बीही खेळले आहेत. अभिनय व खेळापलीकडचेही त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरक आहे. 'द फाऊंडेशन' या संस्थेचे ते संस्थापक आहेत. सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग होण्याचा पिंड असलेल्या बोस यांचा नर्मदा

पान ९ वर »

# 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' आजपासून

» पान १ वरून

आहेत. युनियन बँक बँकिंग पार्टनर आहे. तरुणाई उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहत असते. यश तर मिळवायचे असते; पण मार्गातील अडथळ्यांची शृंखला कधी संपेल, याचे विचारचक्र त्यांच्या डोक्यात फिरत असते.

संघर्षमय वाटचालीतून यशस्वी झालेले नायक त्यांच्यासमोर उभे करून संकटातून यशाकडे कसे जायचे, याचा राजमार्ग 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमातून त्यांना मिळणार आहे. दोन वर्षांपूर्वी सुरू झालेला हा कार्यक्रम तरुणाईच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

तरुणाईच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने कार्यक्रमाची उंचीही वाढत आहे. यंदासुद्धा विविध क्षेत्रांतील नायक तरुणाईला प्रेरणा देणार आहेत. त्यांच्यातील ऊर्जेला फुंकर घालणार आहेत. उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते राहुल बोस यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व असलेल्या राहुल बोस यांची डॉ. थोरात मुलाखत घेणार आहेत. हे कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्यच ठरणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2017
तरुण भारत

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने सोमवार, २७ रोजी 'मराठी अमुचि मायबोली" या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सायंकाळी ६.३० वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात अभंग, भारूड, गोंधळ, पोवाडा आदींचे सादरीकरण करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. सांस्कृतिक कार्यक्रमात अभंग, भारूड, गोंधळ, पोवाडा, पारंपरिक लावणी, संतकवी, मंगळागौर, लळीत, भोंडला, नाट्यसंगीत, प्रहसन आदींचे सादरीकरण होणार आहे. अभिनेता पुष्कर श्रोत्री, गायक धनंजय म्हसकर, उदेश उमप, निरंजन भाकरे, गायिका सोनाली कर्णिक, सुचित्रा भागवत आदी सहभागी होणार आहेत. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठामार्फत आठवडाभर निबंध लेखन, काव्यवाचन, निमंत्रितांचे कवी संमेलन, वाङ्मयीन प्रवाह या विषयावर चर्चासत्र, पथनाट्य, विकीपिडिया नोंदलेखन कार्यशाळा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

**मराठी भाषा दिन :** मराठी भाषा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने 'मराठी आमुची मायबोली' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन. प्रमुख उपस्थिती : जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार. उद्घाटनक : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. स्थळ : केशवराव भोसले नाट्यगृह. वेळ : सायं. ६.३० वा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2017
सकाळ

# 'मराठी अमुचि मायबोली'चे आयोजन

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने 'मराठी अमुचि मायबोली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ फेब्रुवारीला सायंकाळी ६.३० वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात हा कार्यक्रम होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. या कार्यक्रमास डॉ. कुणाल खेमणार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. या कार्यक्रमात अभिनेता पुष्कर श्रोत्री, गायक धनंजय म्हसकर, उदेश उमप, निरंजन भाकरे, गायिका सोनाली कर्णिक, सुचित्रा भागवत सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे लेखन अजित परब व मंदार खराडे यांनी केले असून दिग्दर्शन व संकल्पना सुभाष नकाशे यांची आहे. सुनील कुलकर्णी निर्मिती सूत्रधार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2017
लोकमत

**मराठी आमुची मायबोली :** शिवाजी विद्यापीठ व उच्च तंत्रशिक्षण विभागातर्फे मराठी आमुची मायबोली सांस्कृतिक कार्यक्रम. प्रमुख पाहुणे : डॉ. कुणाल खेमनार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., उद्घाटक : प्रा: डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु शिवाजी विद्यापीठ. वेळ : सायंकाळी ६.30 वा. स्थळ : केशवराव भोसले नाट्यगृह.

27 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी बनताहेत हायटेक वाचक

टॉक टाइम

**Maruti.Patil**
@timesgroup.com
Tweet : @MarutipatilMT

**विद्यार्थ्यांचे वाचन कमी असल्याची टीका नेहमीच होत असली, तरी त्यामध्ये अजिबात तथ्य नाही. विद्यार्थ्यांना वयाला साजेशी आणि काळाचे भान ठेवून लिहिलेली मातृभाषेतील पुस्तके आवडतात. मराठीत भाषांतर केलेल्या अनेक पुस्तकांबाबत ग्रंथालयात सातत्याने विचारणा होते. प्रिंट माध्यमाकडे युवकांचे दुर्लक्ष होत असले, तरी ई-लायब्ररी आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्यार्थीवर्ग वाचनप्रिय बनला आहे. विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करण्याबरोबच ग्रंथालयांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा आधार घेण्याची आवश्यकता आहे. त्याबरोबरच वाचन, कट्टा, ग्रंथदिंडी, पुस्तक प्रदर्शन, आदी मार्गांचा अवलंब करण्याची आवश्यकता असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी व्यक्त केले.**



**विद्यार्थी अवांतर वाचन काय करतात ?**

ग्रंथालयात होणाऱ्या मागणीवरून विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतील आणि त्यांच्या वयाला साजेशी आणि काळाचे भान ठेवून लिहिलेल्या पुस्तकांना त्यांची मागणी असते. सध्याच्या काळातील चेतन भगत, अमिश यांसारख्या लेखकांनी भाषांतरित केलेल्या पुस्तकांना मागणी जास्त आहे. जुन्या काळातील ययाती, मृत्युंजय, छावा या कादंबऱ्यांना नेहमीच मागणी असते. अशा कादंबऱ्यांची ग्रंथप्रदर्शनांत जास्त विक्री होते. एखाद्या कादंबरीवर चित्रपट निघाल्यास त्या कादंबरीच्या मागणीमध्ये वाढ होते. हॅरी पॉटरसारख्या सीरिजमधील पुस्तकांची आवड जोपासली जात आहे. विद्यार्थ्यांच्या मागणीवरून त्यांच्यातील वाचनसंस्कृतीमध्ये बदल झाल्याचे स्पष्ट होत आहे.



**मराठीकडे कसे पाहता ?**

मराठी भाषेचा माध्यम म्हणून वापर होणे आवश्यक आहे. ज्ञानात भर पडण्यासाठी मराठी भाषेतील किंवा मातृभाषेतील पुस्तकांकडे पाहिले जात आहे. मातृभाषेत शिकतात, तेच वाचन करतात. मराठी भाषा विद्यार्थ्यांना वाचनास प्रवृत्त करते. चेतन भगत यांनी लिहिलेल्या पुस्तकावर 'थ्री एडियट' चित्रपट प्रदर्शित झाला. त्यानंतर या पुस्तकाच्या मागणीत वाढ झाली. त्यामुळे कथा-कादंबऱ्यांवर निघालेल्या चित्रपटानंतर पुस्तकांच्या विक्री व वाचनात भर पडते. यावरून मराठी भाषा आणि वाचनाकडे विद्यार्थ्यांचा कल असल्याचे दिसून येत आहे. मराठीला लाभलेली साहित्य परंपरा आजही पुढे जात आहे. त्यामुळे मराठी भाषेचा दर्जा अद्यापही टिकून आहे.

**विद्यार्थ्यांचे वाचन कमी झाले आहे ?**

विद्यार्थ्यांचे वाचन अजिबात कमी झालेले नाही. मात्र, त्यांच्या वाचनाचे माध्यम बदलेले आहे. आतापर्यंत विद्यार्थी प्रिंट पुस्तके वाचत होते, त्याऐवजी ते आता सोशल मीडियाचा वापर करतात. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात ट्विटर, ब्लॉग, फेसबुकच्या माध्यमातून लेखन स्वातंत्र्याबरोबर वाचनाचेही स्वातंत्र्य मिळाले आहे. ई-बुकच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना सहज पुस्तके उपलब्ध होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वाचन कमी झाले आहे, असे म्हणता येणार नाही. यापूर्वी ग्रंथालयाचा सभासद किंवा पुस्तक गिफ्ट मिळाल्यानंतर वाचन होत होते; पण ई-बुकबरोबरच वेगवेगळे ॲप्स डाउनलोड करून वाचनाची आवड जोपासली जात आहे. www.e.sahitya.com वर सातत्यपूर्ण लिखाण केले जात आहे. लॅपटॉप, पामटॉप वाचायला मिळत आहे. काळ बदलला असला, तरी वाचक संख्या कमी झालेली नाही. ई-साहित्यामुळे पुस्तकांची माहिती मिळत असल्याने प्रिंट साहित्याची मागणी वाढत आहे.

**ग्रंथालयाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी काय उपाययोजना आखलात?**

वाचक ग्रंथालयाकडे येत नसल्यास ग्रंथपालांनी वाचकांपर्यंत पोहोचले पाहिजे. प्रिंट माध्यमामध्ये बदल होत असल्याने वाचकांना ई-साहित्य उपलब्ध करून दिले आहे. यासाठी विद्यापीठाने वेब ३.०, लायब्ररी ३.०, बीम डाटा, क्राउड कॉम्पिटिंग यांचा वापर सुरू केला आहे. त्याचा विद्यार्थी लाभ घेत आहेत. जुने प्रकाशक ई-फार्म साहित्यावर प्रकाशित करत आहेत. तसेच ऑनलाइन, सीडी आणि विद्यापीठाच्या सर्व्हरद्वारे विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित केले जाते. ग्रंथालय प्रोटलद्वारे कॅम्पसमधील सेवा दिली जात आहे, ही सुविधा आता कॅम्पसबाहेरही दिली जाणार आहे. त्याचबरोबर वाचन कट्टा, ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सव, ग्रंथ प्रदर्शन अशा पारंपरिक पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना वाचनाकडे आकर्षिक केले जात आहे.

27 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जयसिंगपूर येथे कबड्डी स्पर्धा उत्साहात



जयसिंगपूर : येथील मगदूम कॉलेजवर आयोजित कबड्डी स्पर्धेतील एक क्षण.

**जयसिंगपूर / प्रतिनिधी :**
येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय (लिड कॉलेज) अंतर्गत मुले व मुलींच्या भव्य कबड्डी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. गुप्ता यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे डिन प्रा. आर. एस. पवार, प्रा. पी. पी. पाटील, प्रा. ए. एस. अडदांडे, प्रा. ए. एम. नानीवडेकर, प्रा. पी. आर. पाटील, एम. आर. कुलकर्णी, प्रा. एस. जे. पाटील, पंच प्रकाश कांबळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. तसेच राष्ट्रीय खेळाडू आरती कांबळे हिच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. गुप्ता म्हणाले, ॲकॅडमीबरोबर शारीरिकदृष्ट्या तंदरुस्त राहण्यासाठी खेळ आश्यक आहे. स्पोर्टस्‌मुळे विद्यार्थ्यांसाठी एकसंघ भावना वाढीस लागते. शारीरिक फिटनेस वाढण्यास मदत होते. असे गुप्ता यांनी सांगून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत टीकेआयईटी वारणानगर, डी. वाय. पाटील तळसंदे, अशोकराव माने, संजय घोडावत, संजीवन पन्हाळा, नाना महाडीक अदी इंजिनिअरिंगच्या मिळून एकूण ११ संघांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी टीकेआयईटी वारणानगर संघाने प्रथम क्रमांक पटकाविला, द्वितीय क्रमांक डी. वाय. पाटील कॉलेजने पटकाविला. तसेच तृतीय क्रमांक डॉ. जे. जे. मगदूम इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला. यावेळी मुलींच्याही कबड्डी स्पर्धा पार पडल्या.

27 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘डॉ. जे. जे. मगदूम’ मध्ये कबड्डी स्पर्धा उत्साहात

**प्रतिनिधी**
जयसिंगपूर

येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्यावतीने शिवाजी विद्यापीठामार्फत अग्रमी विद्यालय (लिड कॉलेज) अंतर्गत मुले व मुली कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचा शुभारंभ प्र. प्राचार्य डॉ. ए. के. गुप्ता यांच्या हस्ते झाले.

मुले गटामध्ये - टी.के.आय.ई.टी. वरणानगर (प्रथम), डी.वाय. पाटील तळसंदे (द्वितीय), डॉ. जे. जे. मगदूम इंजिनिअरींग (तृतीय) तर मुली गटामध्ये - एस.जी.आय. अतिग्रे (प्रथम), टी. के.आय.ई.टी. वारणानगर (द्वितीय), डॉ. जे.जे. मगदूम (तृतीय) क्रमांकानी यश संपादन केले. डॉ. ए. के. गुप्ता म्हणाले, ॲकिडिक्स बरोबरच शारीरिक दृष्ट्या तंदुरूस्त राहण्यासाठी खेळ आवश्यक आहेत. खेळामुळे विद्यार्थ्यामध्ये एकसंघ भावना वाढीस लागते. शारीरिक फिटनेस वाढण्यास मदत होते, असे सांगितले. महाविद्यालयाचे डिन ॲकिडिक्स प्रा. आर. एस. पवार, प्रा. पी. पी. पाटील, प्रा. ए. एस. अडदांडे, प्रा. ए. एस. नानविडेकर, प्रा. पी. आर. पाटील, एम. आर. कुलकर्णी, प्रा. एस. जे. पाटील, पंच प्रकाश कांबळे आदी प्रमुख उपस्थित होते. टी.के.आय.टी. वारणानगर, डी. वाय. पाटील तळसंदे, अशोकराव माने, संजय घोडावत, संजीवन पन्हाळा, नाना महाडिक इंजिनिअरींग पेठनाका आदी इंजिनिअरींग विद्यालयातील मुला-मुलींच्या ११ संघानी सहभाग घेतला होता. बक्षिस वितरण प्रा. एस. पी. गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. अजय चव्हाण, मनोज गावडे, प्राध्यापक उपस्थित होते. संयोजन व स्वागत ए. बी. यादव यांनी केले. आभार व्ही. एस. चव्हाण यांनी मानले.



**जयसिंगपूर : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जे.जे. मगदूमचे प्र. प्राचार्य डॉ. ए.के. गुप्ता व व्यासपीठावर मान्यवर**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2017
पुण्यनगरी

# आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत स्वाती शिंदेस कास्यपदक

**मुरगूड / प्रतिनिधी :**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाची विद्यार्थिनी, मंडलिक साई आखाड्याची मल्ल स्वाती शिंदे हिने शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत ५३ किलो वजनगटात कास्यपदक पटकावले.



सिरसा (हरियाणा) येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा झाल्या. देशातील ६६ स्पर्धकांनी ५३ किलो वजनगटात भाग घेतला होता. मुरगूडच्या मंडलिक साई कुस्ती आखाड्यात एनआयएस कोच दादासाहेब लवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणारी स्वाती शिंदे हिने पहिल्या फेरीत मुंबई विद्यापीठाच्या स्नेहलवर विजय मिळवला. दुसऱ्या फेरीत वाराणशीच्या आस्था शर्माला चितपट केले.

तिसऱ्या फेरीत दिल्लीच्या वृषालीला खेमी पराभूत केले; मात्र चौथ्या फेरीत रोहतकच्या सीमाकडून ६-४ अशा गुणफरकांनी स्वाती पराभूत झाली. रिपचेस राऊंडमध्ये यूपीच्या रमन यादवला १४-४ असे हरवल्यामुळे कास्यपदक लढतीची संधी मिळाली. या लढतीत कर्नाटकच्या बंशीरास हरवत कास्यपदक पटकावले. तिला प्रशिक्षक दादासाहेब लवटे, वस्ताद सुखदेव येरुडकर यांचे मार्गदर्शन, तर संस्था सेक्रेटरी संजयदादा मंडलिक, वीरेंद्र मंडलिक, कार्यवाह आण्णासाहेब थोरवत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, क्रीडाशिक्षक प्रा. शिवाजी पोवार, वडील संजय शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले.

27 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुघलांच्या विघटनानंतर भारतात सरंजामशाही

## डॉ. गवळी : डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : केंद्रीय सत्ता दुबळी झाल्यावर सरंजामशाहीचा उदय झाला. १८ व्या शतकात मुघलांच्या विघटनानंतर भारतात सरंजामशाही अस्तित्वात आली, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. पी. ए. गवळी यांनी व्यक्त केले. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास विभाग शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजित डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. 'पेशवेकालीन सरंजामशाही' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विभागप्रमुख डॉ. पद्मजा पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. पाटील म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांनी पेशव्यांच्या मोहिमांचा आर्थिकदृष्ट्या अभ्यास, व्रतवैकल्ये, लग्नसंस्था, जाती संस्थेतील तथ्ये शोधण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे.'' या वेळी प्रा. डॉ. नंदा पारेकर, प्रा. डॉ. अवनिश पाटील, प्रा. अविनाश भाले, प्रा. निलीशा देसाई, उमेश भोसले उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक प्रा. निलांबरी जगताप यांनी संयोजन केले.



**कोल्हापूर : डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. पी. ए. गवळी.**